SPB
SHRI PISARNATH
BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर

मा.खा.रावसाहेब पाटील दानवे
(अध्यक्ष)
(माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)

मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे
(सचिव)
(छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)

मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे
(भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705

वर्ष : ०५ | अंक : ३२१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०२ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## नवी मुंबईत उघड्या वायरींचा पाण्यात करंट
## दोन मुलींना शॉक लागला; शहरात खळबळ



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नवी मुंबई :** मुंबईसह उपनगरात पावसाला सुरुवात झाली आहे. सकाळपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. नवी मुंबईत पावसाचा कहर पहायला मिळत आहे. या पावसामुळे वेगवेगळे अपघातदेखील घडले आहेत. नेरूळ येथील LP ब्रिज शेजारी दोन विद्यार्थीनींना शॉक लागल्याची घटना समोर आली आहे. या मुली रस्त्याने जात असताना विजेची वायर खाली पडली होती, या वायरचा मुलींना स्पर्श झाल्याने त्या दोघींना शॉक लागला त्या बेशुद्ध पडल्याचे समोर आले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**नेरूळमध्ये विद्यार्थीनींना लागला शॉक**

LP ब्रिज शेजारी दोन विद्यार्थीनींना शॉक लागल्याने नेरूळमध्ये खळबळ उडाली आहे. या मुलींना बाजूला असलेल्या डी वाय पाटील या रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. मात्र महानगरपालिकेने त्यांना सध्या वाशीतील फोर्टीज रुग्णालयात देखरेकीखाली ठेवले आहे. पहिल्याच पावसात ही खळबळजनक घटना घडली आहे. सध्या घटनास्थळी बॅरिकेट लावून परिसर सील करण्यात आलेला आहे. महावितरणचे अधिकारी आणि पोलिस या घटनेचा अधिकचा तपास करत आहेत.

**काय म्हणाल्या महापौर?**

या घटनेबाबत बोलताना नवी मुंबई महापालिकेच्या महापौर सुजाता पाटील यांनी म्हटले की, 'ही दुर्दैवी घटना आहे, नक्की चूक कोणाची आहे याचा आम्ही तपास करत आहोत. महावितरण की इतर कोणी दोषी आहे याचा तपास सुरू आहे. या दोन मुलींना आम्ही फोर्टीज रुग्णालयात देखरेखीसाठी ठेवलं आहे. दरम्यान, या विद्यार्थीनींना प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर घरी सोडण्यात येणार असल्याचीही माहिती समोर आली आहे.'

**नवी मुंबईत अनेक ठिकाणी साचले पाणी**

नवी मुंबईतील अनेक भागात पाणी साचले आहे, याबाबत बोलताना सुजाता पाटील यांनी म्हटले की, ज्या ठिकाणी पाणी साचलं तिकडे मी जात आहे. प्रत्येक अधिकाऱ्याला मी काम योग्य पद्धतीने करायला सांगत आहे. नालेसफाई झाली आहे, मात्र आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. सिडको देखील दुर्लक्ष करत आहे, त्यामुळे पाणी साचलं आहे. आम्ही सिडकोच्या एमडींशी बोलण्याचा प्रयत्न करत आहोत.

# मुसळधार पावसाचा हैदौस, पालघरमध्ये शाळांना सुट्टी
## डोंबिवलीत बदलापूर-काटई रस्ता वाहतुकीसाठी बंद



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, ठाणे/पालघर :** राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरु आहे. मुंबई, ठाण, पालघर, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडत आहे. ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली शहराला पावसाने अक्षरश: झोडपून काढलं आहे. तसेच पालघर जिल्ह्यातही जोरदार पाऊस पडत आहे. पालघर जिल्ह्यातील विविध भागांमध्ये आज मुसळधार पाऊस पडला आहे. याशिवाय उद्याही दिवसभर जोरदार पावसाची शक्यता आहे. कारण हवामान विभागाने पालघर जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. मुसळधार पावसाचा हा अंदाज पाहता पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पालघरमधील सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे.

**शीळफाटा परिसरात प्रचंड पाणी**

कल्याण आणि डोंबिवली शहरांतही आज जोरदार पाऊस पडत आहे. मंगळवारी रात्रीपासून कल्याण आणि डोंबिवली शहरांत मुसळधार पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे शीळफाटा परिसरात वाहनं पाण्याखाली गेले आहेत. तसेच शीळ रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे. त्यामुळे म ोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

**प्रशासनाला रस्त्याचे डिव्हायडर तोडावे लागले**

याच शीळ रोडच्या पुढे काटई नाका परिसरात मोठ्या प्रमाणात पावसाचं पाणी साचलं होतं. इथल्या पाण्याचा निचरा व्हावा यासाठी प्रशासनाला चक्क रस्त्यावरील डिव्हायडर तोडावा लागला आहे. यानंतर बदलापूर-काटई रस्त्यावर पुढे अनेक ठिकाणी पाणी साचलं आहे.

**बदलापूर-काटई रस्ता वाहतुकीसाठी बंद**

नेवाली नाका परिसरात गुडघाभर पाणी साचलं आहे. यामुळे सुरक्षेच्या कारणासाठी बदलापूर-काटई रस्ता हा वाहतुकीसाठी काही काळ बंद करण्यात आला. पाऊस कमी झाला किंवा थांबला आणि पावसाच्या पाण्याचा निचरा झाल्यानंतर वाहतूक पुन्हा सुरु केली जाण्याची शक्यता आहे. दरम्यान,नेवाली नाका परिसरात वाहतूक पोलीस पोहोचले आहेत. त्यांच्याकडून योग्य ती खबरदारी घेतली जात आहे.

**कल्याण पूर्वेत इमारतीच्या तळम जल्यावर पाणी साचलं**

मुसळधार पावसामुळे कल्याण पूर्वे तील साई विहार संकुल इमारतीच्या तळमजल्यावर पाणी साचलं आहे. नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरलं आहे. यामुळे घरातील फर्निचर आणि इतर सामानाचे नुकसान झाले आहे. पाऊस असाच सुरु राहीला तर या परिसरातील घरांमध्ये कंबरेइतके पाणी साचण्याची भीती आहे.

**वाहतुकीवर मोठा परिणाम**

कल्याण डोंबिवलीत सुरु असलेल्या मुसळधार पावसाने वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी सखल भागांत पाणी साचलं आहे. रस्त्यांवर पाणी साचलं आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण होताना दिसत आह. पाऊस असाच सुरु राहीला तर वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची भीती आहे. दरम्यान, प्रशासनाकडून योग्य ती काळजी घेण्याचा पूरेपूर प्रयत्न केला जात आहे.

**शिळफाटा-मुंब्रा रोड पाण्याखाली**

मुसळधार पावसामुळे ठाणे-मुंब्रा-शिळफाटा रोडला नदीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. या भागातील रस्त्यावर प्रचंड मोठ्या प्रमाणात पाणी साचलं आहे. यामुळे वाहनचालकांना आपली वाहनं घेऊन जाताना मोठी कसरत करावी लागत आहे. याशिवाय कल्याण पूर्वेतील मलंगडगड रोडवरदेखील अशीच काहीशी अवस्था झाली आहे.

## विधान परिषद उपसभापतीपदी सचिन अहिर यांची एकमताने झालेली निवड लोकशाही परंपरांचा विजय



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०१, मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची एकमताने झालेली निवड ही सभागृहाच्या लोकशाही परंपरा आणि संसदीय मूल्यांचा विजय असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विधान परिषदेत सचिन अहिर यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व पक्षांनी सभागृहाच्या उच्च परंपरांचा मान राखत एकमताने ही निवड करण्याचा निर्णय घेतला. यामुळे संसदीय लोकशाही अधिक बळकट झाली असून, सभागृहाच्या सुदृढ परंपरा जपण्याची सामूहिक भावना अधोरेखित झाली आहे. उपसभापतीपदी सचिन अहिर यांची झालेल्या निवडीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे अभिनंदन करत, त्यांच्या प्रदीर्घ राजकीय अनुभव, संतुलित दृष्टिकोन आणि सर्वसमावेशक नेतृत्वाचा सभागृहाच्या कामकाजाला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सचिन अहिर यांनी विधानसभा सदस्य, राज्यमंत्री आणि विधान परिषद सदस्य म्हणून विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. जनसामान्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका, अभ्यासू वृत्ती, निर्भीड कार्यशैली आणि सर्वांशी सुसंवाद राखण्याची क्षमता ही त्यांची जमेची बाजू असून, उपसभापतीपदाची जबाबदारी ते समर्थपणे पार पाडतील.

उपसभापती पद हे घटनात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असून, या पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीने सर्व सदस्यांना समान न्याय देणे अपेक्षित असते. सचिन अहिर आपल्या संयमी, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक कार्यपद्धतीमुळे सभागृहाच्या गौरवशाली परंपरांना अधिक बळकटी देतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी माजी उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या कार्याचाही गौरव केला. महिलांवरील अत्याचार, दलित, पीडित आणि वंचित घटकांच्या प्रश्नांबाबत त्यांनी घेतलेली संवेदनशील आणि निष्पक्ष भूमिका उपसभापतीपदाची प्रतिष्ठा अधिक उंचावणारी ठरल्याचे त्यांनी नमूद केले.

विधान परिषद उपसभापतीपदाची समृद्ध परंपरा अधोरेखित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, रा. सू. गवई, सूर्यभान वहाडणे आणि वसंतराव डावखरे यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांनी या पदाची गौरवशाली परंपरा निर्माण केली आहे. सचिन अहिरही ही परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सचिन अहिर यांच्या सार्वजनिक जीवनाचा आढावा घेताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, १९९३ मध्ये कामगार चळवळीतून त्यांनी सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. गिरणी कामगारांच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. १९९९ ते २०१४ या काळात ते सलग तीन वेळा विधानसभा सदस्य म्हणून निवडून आले. गृहनिर्माण, सामाजिक न्याय, पर्यावरण, खनिकर्म आणि आदिवासी विकास या विविध विभागाचे राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली. तसेच मुंबईतील सामाजिक, सांस्कृतिक आणि संघटनात्मक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.अशिष शेलार व अन्य सदस्यांनीही मनोगत व्यक्त करुन उपसभापती सचिन अहिर यांचे अभिनंदन केले.

## सावली वनपरिक्षेत्रातील चिखली चक येथे नर वाघ मृतावस्थेत आढळला

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील व्याघ्रसंपदेसाठी ओळखल्या जाणाऱ्या परिसरात पुन्हा एकदा वाघाच्या मृत्यूची घटना समोर आल्याने वनविभागासह वन्यजीवप्रेमींम ध्ये खळबळ उडाली आहे. चंद्रपूर वनविभागाच्या सावली वनपरिक्षेत्रातील चिकली चक क्रमांक २ (ता. मूल) येथील बिगर वनक्षेत्रात सुमारे ६ ते ७ वर्षे वयाचा प्रौढ नर वाघ मृतावस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती मिळताच वनविभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत संपूर्ण परिसर ताब्यात घेत तपास सुरू केला.

वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (३० जून) दुपारी सुमारे १ वाजता सर्व्हे क्रमांक ७८, चितेगाव बिट, राजोली राऊंड, सावली वनपरिक्षेत्रातील बिगर वनक्षेत्रात वाघाचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक पाहणीत वाघाचा मृत्यू साधारणपणे एक दिवसापूर्वी झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक वनसंरक्षक विकास तरसे, सावलीचे वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे, डब्लुयू पी एस आय चे प्रतिनिधी मुकेश भांदककर, इको-प्रोचे राजू काहीलकर, तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विलास गावखरे, डॉ. कुंदन पोडचेलवार, डॉ. आकाश गोमकाळे, बायोलॉजिस्ट अक्षय नारनवरे आणि नॅशनल टायगर कन्झर्व्हेशन अथॉरिटी (एनटीसीए) च्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत घटनास्थळाची बारकाईने तपासणी करण्यात आली.

- प्राथमिक तपासणीत वाघाच्या शरीरावरील सर्व अवयव सुरक्षित आणि सुस्थितीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अवयव तस्करी किंवा शिकारीसाठी वाघाची हत्या करण्यात आल्याचा कोणताही ठोस पुरावा प्राथमिक तपासात आढळून आलेला नाही. तरीही वनविभागाने सर्व शक्यता गृहीत धरून तपास सुरू ठेवला आहे.
- त्यानंतर राजोली रोपवाटिकेत अत्याधुनिक पद्धतीने वाघाचे शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनादरम्यान आवश्यक जैविक नमुने प्रयोगशाळेच्या तपासणीसाठी जतन करण्यात आले असून, रासायनिक व फॉरेन्सिक अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. त्याम ुळे विषबाधा, अंतर्गत दुखापत, नैसर्गिक कारणे किंवा इतर कोणतेही कारण याबाबत अद्याप अधिकृत निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. चंद्रपूर जिल्हा हा देशातील महत्त्वाच्या व्याघ्र अधिवासांपैकी एक मानला जात असल्याने या घटनेकडे वन्यजीव संवर्धन क्षेत्राचे विशेष लक्ष लागले आहे. वाघाचा




मृत्यू नेमका कशामुळे झाला, याचा तपास वनविभाग, पशुवैद्यकीय तज्ज्ञ आणि एनटीसीए यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, अंतिम अहवालानंतरच सत्य परिस्थिती स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले असले तरी नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीचीच दखल घ्यावी, असे आवाहन वनविभागाने केले आहे. वाघाचे सर्व अवयव सुरक्षित आहेत. शवविच्छेदन पूर्ण झाले असून मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील माहिती जाहीर करण्यात येईल, अशी माहिती सावलीचे परिक्षेत्र वन अधिकारी विनोद धुर्वे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

## सोलापूर जि.प.चा ऐतिहासिक निर्णय : चेतनसिंह केदार-सावंत यांच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज: विकास सरवळे**

**दि.०१, पंढरपूर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातच दर्जेदार उच्च प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सोलापूर जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. शासनाच्या दि.१५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील निकषांची पूर्तता करणाऱ्या जिल्ह्यातील २३ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या शिफारशीनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी वर्गवाढीस प्रशासकीय मान्यता




दिली. शासन निर्णयातील सर्व अटी व निकषांची काटेकोर पडताळणी करूनच हा निर्णय घेण्यात आला आहे.

यापूर्वी अनेक गावांतील विद्यार्थ्यांना चौथीनंतर पुढील शिक्षणासाठी शेजारच्या गावात जावे लागत होते. वाहतुकीची अडचण, आर्थिक परिस्थिती आणि सुरक्षिततेच्या कारणांमुळे अनेक विद्यार्थी, विशेषतः मुली, शिक्षण अर्धवट सोडत होते. आता गावातच

> ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी २३ जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पाचवी सुरू करण्यास मंजुरी मिळाली, ही आनंदाची बाब आहे. या निर्णयामुळे शाळा गळती कमी होऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मोठे बळ मिळेल. शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आणि प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी आमचे प्रयत्न यापुढेही सुरू राहतील. ग्रामीण भागातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहणार आहे.
>
> **– चेतनसिंह केदार-सावंत,**
> **सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जि.प.सोलापूर**

पाचवीचा वर्ग उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांची शाळा गळती रोखण्यास मोठी मदत होणार आहे. पालकांचा आर्थिक व मानसिक ताणही यामुळे कमी होणार आहे.

या निर्णयामुळे बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (ठढए) कायद्याचा उद्देश अधिक प्रभावीपणे साध्य होणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला घराजवळच शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या धोरणाला यामुळे बळ मिळणार असून, ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा मिळेल, अशी प्रतिक्रिया शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे. या निर्णयाचे जिल्हाभरातून स्वागत होत आहे.




## घरगुती गॅस सिलेंडरचे दर या महिन्यात कमी होणार?



अमेरिका इराण युद्ध थांबल्यानंतर होर्मुज सामुद्रधुनीतून मालवाहतूक जहाजांची वाहतूक सुरू झाली आहे. त्याचा परिणाम आता इंधनाच्या दरावर दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून वाढलेले दर आता कमी होताना दिसत आहेत. तणावाच्या काळात जगभरातील व्यावसायिक एलपीजी आणि कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाली होती. त्याचा थेट परिणाम बजेटवर झाला होता. आता सर्व काही सुरळीत होत असताना सरकारी मालकीच्या तेल आणि वायू विपणन कंपन्यांनी १ जुलै रोजी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत प्रति लिटर १८३.५ रुपयांनी आणि एव्हिएशन टर्बाइन फ्युएलची (एटीएफ) किंमत प्रति लिटर ५ रुपयांनी कमी केली आहे. व्यावसायिक एलपीजी आणि एटीएफ दोन्ही अनियंत्रित इंधन आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय मानकांच्या आधारे दर महिन्याच्या पहिल्या तारखेला किमती सुधारल्या जातात.

अमेरिका इराण युद्ध स्थितीत भारतात अनियंत्रित इंधनाच्या किमती चार पटीने वाढल्या होत्या. या काळात व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत १३७३ रुपयांनी वाढली होती. मुंबईत १९ किलो व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत १८३.५ रुपाने कमी झाली असून मुंबईत आता २८८४ रुपये झाली आहे. तर दिल्लीत २९३०, कोलकात्यात ३०७२ आणि चेन्नईत ३०९९.५ रुपये झाली आहे. फ्री ट्रेड एलपीजी सिलेंडरच्या दरातही १३ रुपयांनी कपात केली आहे. पण १४.२ किलोच्या घरगुती एलपीजी सिलेंडरची किंमत सुमारे ९४२ रुपये इतकीच आहे. त्यामुळे या महिन्यात घरगुती सिलेंडर दरात घट होण्याची शक्यता आहे. घरगुती सिलेंडरच्या दरात कपात होण्याची पाच शक्यता

अमेरिका इराण युद्ध थांबल्यानंतर होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाली आहे. त्यामुळे गॅस आणि तेलवाहू जहाजांची वाट मोकळी झाली आहे. भारतही याच मार्गातून तेल आयात करतो. त्यामुळे पुरेसा साठा उपलब्ध होणार असून घरगुती एलपीजी सिलेंडरच्या किंमती कमी होऊ शकतात.

व्यावसायिक सिलेंडरच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारातील कल आणि आयात खर्चावर अवलंबून असतात. व्यावसायिक सिलेंडरच्या किंमती कमी झाल्याने दबाव कमी झाल्याचं दिसत आहे. त्यामुळे भारतातील घरगुती गॅसच्या किमतीत घट होऊ शकते.

भारताने अमेरिकेतून दरवर्षी २.२ दशलक्ष टन एलपीजी आयात करण्याचा करार केला आहे. केप्लरच्या हवाल्याने रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, जून २०२६ मध्ये अमेरिकेतून होणारी भारताची एलपीजी आयात १ दशलक्ष टनांचा विक्रमी आकडा ओलांडण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुरवठा वाढला की किमतीवर कमी होतील.

भारत कतारकडून मोठ्या प्रमाणात इंधन आयात करतो. इराण-अमेरिका युद्धाच्या काळातही, कतारने भारताला अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना केल्या होत्या. आता होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाल्यामुळे, भारताचा आयात खर्च आणि पुरवठ्यातील जोखीम कमी होऊ शकते. याचा परिणाम देशांतर्गत एलपीजी सिलेंडरच्या किमतींवरही दिसून येऊ शकतो. इंडक्शन कुकर आणि एअर फ्रायर यांसारख्या इलेक्ट्रॉनिक स्वयंपाक उपकरणांचा वापर वाढला आहे. लोकांचे एलपीजी गॅस सिलिंडरवरील अवलंबित्व कमी झाले आहे. यामुळे घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतीत घट होऊ शकते.

# श्रद्धा, सत्ता आणि मौन :
# राम मंदिरातील गैरव्यवहार व पेपरफुटीवर पंतप्रधान गप्प का?

देशाच्या राजकारणात काही विषय असे असतात की, त्यांच्यावर सरकारची भूमिका जितकी महत्त्वाची असते, तितकेच महत्त्व त्या विषयावरचे सरकारचे मौनही असते. कारण लोकशाहीत शांतता म्हणजे नेहमीच समाधान नसते तर अनेकदा ती उत्तरदायित्वापासून दूर राहण्याची भूमिका असते. आज देशासमोर असेच दोन गंभीर प्रश्न उभे आहेत. एक अयोध्येतील राम मंदिराशी संबंधित कथित आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप आणि दुसरे सातत्याने घडणाऱ्या विविध भरती व स्पर्धा परीक्षांतील पेपरफुटीच्या घटना. या दोन्ही विषयांनी देशभरात चर्चा निर्माण केली आहे. मात्र या प्रश्नांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मौन अधिकच चर्चेचा विषय ठरत आहे. राम मंदिर हा केवळ दगड-विटांचा प्रकल्प नाही, तो कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा विषय आहे. अनेक दशकांच्या संघर्षानंतर उभे राहिलेले हे मंदिर राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक म्हणून मांडले गेले. त्यामुळे त्याच्याशी संबंधित कोणत्याही आर्थिक व्यवहारात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि शंका दूर करणारी स्पष्ट भूमिका अपेक्षित असणे स्वाभाविक आहे. विविध माध्यमांमध्ये मंदिर परिसरातील कामे, जमीन व्यवहार किंवा निधीच्या वापराबाबत वेळोवेळी आरोप समोर आले. हे आरोप सिद्ध झाले आहेत, असे म्हणणे योग्य ठरणार नाही, परंतु आरोप झाले असतील तर त्यांची निष्पक्ष चौकशी व्हावी, ही लोकशाहीची मूलभूत अपेक्षा आहे.

श्रद्धेच्या नावाने जनतेकडून विश्वास मागायचा आणि त्याच श्रद्धेशी संबंधित प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक किंवा धर्मविरोधी ठरवायचे, ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोकादायक आहे. कारण श्रद्धेला प्रश्न विचारले जात नाहीत, पण सार्वजनिक निधी, संस्थात्मक निर्णय आणि प्रशासनाला नक्कीच विचारले जाऊ शकते. राम मंदिर हे कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नसून देशाच्या भावविश्वाचा भाग आहे. त्यामुळे त्याच्या व्यवस्थापनातील पारदर्शकता ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. दुसरीकडे, पेपरफुटीच्या घटनांनी तर देशातील लाखो तरुणांचे भविष्य अक्षरशः वेठीस धरले आहे. मागील काही वर्षांत विविध राज्यांतील तसेच राष्ट्रीय स्तरावरील अनेक




भरती परीक्षा आणि प्रवेश परीक्षा पेपरफुटीच्या आरोपांनी गाजल्या. विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतात, आर्थिक अडचणींवर मात करतात, कुटुंबाच्या अपेक्षा सांभाळतात पण परीक्षेच्या आदल्या दिवशी किंवा परीक्षेनंतर पेपरफुटी झाल्याचे समोर येते आणि त्यांच्या परिश्रमांवर एका क्षणात पाणी फिरते. पेपरफुटी ही केवळ परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी नाही तर ती देशाच्या गुणवत्ताधारित व्यवस्थेवरचा हल्ला आहे. मेहनती विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास खचवणारी आणि भ्रष्ट मार्ग स्वीकारणाऱ्यांना प्रोत्साहन देणारी ही प्रवृत्ती आहे. जेव्हा वारंवार अशा घटना घडतात, तेव्हा प्रश्न फक्त गुन्हेगारांचा राहत नाही तर प्रश्न व्यवस्थेच्या अपयशाचा बनतो.

केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा कायदा लागू केला, कठोर शिक्षेच्या तरतुदी केल्या. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी कायदे पुरेसे नसतात, त्यांची प्रभावी अंमलबजावणी अधिक महत्त्वाची असते. जर पेपरफुटीची मालिका सुरूच राहिली, तर कायद्याची भीती कुठे आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. या दोन्ही विषयांना जोडणारा समान धागा म्हणजे 'विश्वास'. राम मंदिरावरील विश्वास आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास. समाजाचा विश्वास तुटू लागला, तर कोणतीही व्यवस्था मजबूत राहू शकत नाही. म्हणूनच या प्रश्नांवर सरकारने केवळ प्रशासकीय नव्हे, तर नैतिक नेतृत्वही दाखवणे आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी



**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

हे देशातील सर्वाधिक प्रभावशाली राजकीय नेतृत्व मानले जातात. एखाद्या यशस्वी मोहिमेचे श्रेय स्वीकारताना त्यांचे नेतृत्व पुढे येते. मग गंभीर आरोप, व्यवस्थेतील त्रुटी किंवा जनतेच्या अस्वस्थतेच्या प्रश्नांवरही त्याच नेतृत्वाने स्पष्ट भूमिका मांडणे अपेक्षित नाही का? लोकशाहीत नेतृत्वाची खरी कसोटी संकटाच्या वेळी होते, यशाच्या वेळी नव्हे. हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रश्न विचारणे म्हणजे सरकारविरोधी भूमिका नव्हे. उलट, सत्तेला प्रश्न विचारणे ही लोकशाहीची ताकद आहे.

कोणत्याही सरकारला जनतेने अमर्याद अधिकार दिलेले नसतात तर जनतेने त्यांना उत्तरदायित्वाची जबाबदारी दिलेली असते. त्यामुळे पंतप्रधान गप्प का? हा प्रश्न व्यक्तीविरोधी नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाचा प्रश्न आहे. आज देशातील तरुण रोजगार, परीक्षा आणि संधी याबाबत अस्वस्थ आहेत. दुसरीकडे धार्मिक श्रद्धेशी संबंधित संस्थांमध्ये पारदर्शकतेची अपेक्षा वाढत आहे. या दोन्ही भावना दुर्लक्षित करणे योग्य ठरणार नाही. सरकारने सर्व आरोपांची निष्पक्ष चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि पारदर्शक माहिती जनतेसमोर ठेवण्याची तयारी दाखवली पाहिजे. त्यामुळे अफवा थांबतील आणि विश्वास अधिक दृढ होईल. लोकशाहीत मौन हे अनेकदा राजकीय धोरण असू शकते, परंतु दीर्घकाळ टिकणारे मौन लोकांच्या मनात संशय निर्माण करते. संशयाला उत्तर देण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पारदर्शकता. श्रद्धेचे राजकारण करता येते पण श्रद्धेचा विश्वास टिकवण्यासाठी प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्याचप्रमाणे युवकांच्या भविष्याची भाषा भाषणांतून करता येते, पण त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी निष्पक्ष आणि भ्रष्टाचारमुक्त परीक्षा व्यवस्था उभारावी लागते. देशाला आज घोषणांपेक्षा उत्तरांची गरज आहे. प्रश्नांना विरोधकांचा अजेंडा म्हणून नाकारण्यापेक्षा त्यांना लोकशाहीच्या आरशात पाहणे अधिक आवश्यक आहे. कारण राम मंदिराची प्रतिष्ठा असो किंवा विद्यार्थ्यांचे भविष्य दोन्हीही पक्षीय राजकारणापलीकडचे विषय आहेत.

देशाला आज घोषणांपेक्षा उत्तरांची गरज आहे. कोणत्याही आरोपांचे सत्य न्याय्य, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशीतूनच समोर यायला हवे. प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक म्हणून नाकारण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांकडे लोकशाहीच्या आरशातून पाहणे अधिक आवश्यक आहे. कारण राम मंदिराची प्रतिष्ठा असो वा देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य, हे दोन्ही विषय पक्षीय राजकारणाच्या पलीकडचे आहेत. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने या मुद्द्यांवर स्पष्ट, ठाम आणि पारदर्शक भूमिका मांडली, तर लोकशाहीवरील विश्वास अधिक दृढ होईल. अन्यथा मौनाचे अर्थ जनता स्वतः लावू लागते. लोकशाहीत सत्तेपेक्षा उत्तरदायित्व मोठे असते आणि जेव्हा उत्तरांपेक्षा मौन अधिक बोलके ठरते, तेव्हा लोकशाहीतील प्रश्न अधिक गंभीर बनतात.

## डॉक्टर परिक्षा

कैकवेळा आरोग्यचं
घे डॉक्टरांची परिक्षा
मानतो खरेचं देवदूत
करी अंतरी समिक्षा

जीव घाले धोक्यात
जनतेची आधी रक्षा
त्यांच्यावर करे हल्ले
गळेते नैतिक सुरक्षा

सर्दी पडसे खोकला
लगे डॉक्टर प्रतिक्षा
दुर्धर आजारमुक्तता
कुठे पळते तितिक्षा

डॉक्टरखरे धन्वंतरी
वृध्दींगत हो बुभुक्षा
पैसे मोजतो आपण
त्वरीतरोगात मुमुक्षा

घे दवा अन् हो बरा
त्वरीत असे अपेक्षा
बील दिसे अवाजवी
लगेचं करतो उपेक्षा

सकल संतु निरामय :
एवढीचं हो सदिच्छा
आजारपण ना देगा
डॉक्टरदिन शुभेच्छा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# महाराष्ट्रात छम,छम कायमची बंद होणारं?

महाराष्ट्रात डान्स बारवर पूर्णपणे बंदी नसली तरी, त्यासंदर्भातील कायदे अत्यंत कडक करण्यात आले आहेत. काही बारचालक 'परफॉर्मिंग लायसन्स' चा गैरवापर करून डान्स बार चालवत असल्याचे निदर्शनास आल्याने, राज्य सरकारने मुंबई पोलीस अधिनियमामध्ये कडक दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात डान्स बारवर नियंत्रण ठेवण्यासाठी करण्यात आलेल्या विद्यमान कायद्यातील पळवाटा बंद करण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्र पोलिस अधिनियमात दुरुस्ती करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितल्याचे वृत्त आहे. त्यामुळे या दुरुस्तीनंतर डान्स बार चालविण्यासाठी महाराष्ट्र डान्स बार कायद्यांतर्गत परवाना घेणे बंधनकारक रहाणारं आहे. पोलीस कायद्यांतर्गत केवळ सादरीकरण अर्थात परफॉर्मिंग लायसन्स घेवून डान्स बार चालविण्याच्या प्रथेला आळा बसेल काही ठिकाणी ऑर्केस्ट्रा बार उशिरापर्यंत सुरु असल्याचे बोलले जात आहे. राज्यांत डान्स बारवर कडक निर्बंध असताना आजही काही अस्थापनांकडून पोलीस कायद्यांतर्गत परफॉर्मिंग लायसन्स घेवून प्रत्यक्षात डान्स बार चालविले जात आहेत असल्या गैर प्रकाराला रोखण्यासाठी पोलीस कायद्यांतर्गत दुरुस्ती करण्यात येणार आहे. काही डान्स बारमध्ये महिलांची छेडछाड, विनयभंग, दहशत आणि गुन्हेगारी घटना घडल्याची ताजी उदाहरणे आहेत. महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री स्वर्गीय आर. आर. पाटील (आबा) यांनी २००५ मध्ये राज्यातील संस्कृतीचे रक्षण आणि तरुण पिढीला गुन्हेगारीपासून वाचवण्यासाठी डान्सबार बंदीचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. मात्र, या निर्णयाविरोधात बार चालकांनी न्यायालयात धाव घेतली आणि २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने डान्सबारवरील बंदी पूर्णपणे उठवली कायदे कडक आहेत मात्र त्याची अमंलबजावणी कशी होते. यावर सर्वकाही अवलंबून असते त्यामुळे विद्यमान सरकारला कितपत यश मिळते ते पहाणे मोठे औत्सुक्याचे ठरणारं आहे !

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

# छत्रपती शाहू विचारांचा जागर निबंध स्पर्धेत के.रामलू पब्लिक स्कूलचे सुयश

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०१, कुंडलवाडी (नांदेड) :** बिलोली तालुकास्तरीय 'छ.शाहू विचारांचा जागर' अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत कुंडलवाडी येथील के.रामलू पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट लेखणीच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन्ही गटांत बाजी मारली. प्राथमिक गटात कुमारी आरोही चंद्रगुप्त कुंडलवाडीकर हिने ५० पैकी ४४ गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, माध्यमिक गटात कुमारी अनुष्का विलास शिंदे हिने ५० पैकी ३९ गुण प्राप्त करत तृतीय क्रमांक मिळविला. यशस्वी ठरलेल्या या दोन्ही विद्यार्थिनींना शाळेतील मार्गदर्शक



शिक्षक हमंद सर व कासलोड सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या अचूक मार्गदर्शनामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश खेचून आणले.

विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार, संचालिका रमा ठक्कूरवार, सचिव यशवंत संगमवार, प्रिंसिपल जाधव सर, व्हाइस प्रिन्सिपल एम.सपना तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थिनींचे मनापासून अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे के. रामलू पब्लिक स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## सी.पी.जी. कंपनीमधील तरुणाच्या मृत्यूची चौकशी करा कामगार सेनेचे अध्यक्ष रवीश रासकर यांची मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये सी.पी.जी. कंपनीतील कामगार तुषार राजेंद्र पाटील (वय २७) याचा मृत्यू झाला. तो कामगार जळगाव जिल्ह्यातील मुळचा रहिवाशी होता. त्याच्या मृत्यूची चौकशी करा, अशी मागणी काँग्रेस कामगार सेनेचे पारनेर तालुकाध्यक्ष रवीश रासकर यांनी केली.

याबाबत सहायक कामगार आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, सुपा एमआयडीसीमध्ये अशा घटना वारंवार घडतात. कामगारांच्या भवितव्यासाठी कामगारांच्या कायद्यात बदल करून हा कायदा थोडा कडक करावा. जेणेकरून अशा घटना वारंवार होणारा नाही. या घटनेची त्या कंपनीतील सीसीटीव्ही तपासून योग्य ती चौकशी करावी. त्या युवकाच्या कुटुंबीयांना त्या कंपनीकडून आर्थिक मदत मिळून द्यावी. आदी मागण्यांचे निवेदन काँग्रेस कामगार सेनेचे रवीश रासकर यांनी सहायक कामगार आयुक्त जाधव, पोलिस अधीक्षक यांना दिले आहे.

## बोथ तांड्यावर वसंतराव नाईक यांची ११३ वी जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०१, चारठाणा (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील बोथ तांडा येथे हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी विनम्र अभिवादन केले. त्यांच्या कृषी विकास, ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी आणि शेतकरी कल्याणासाठी दिलेल्या मोलाच्या योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला तांड्यातील ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. यामध्ये देविदास राठोड, अंबादास राठोड, ज्ञानेश्वर चव्हाण, दिलीप चव्हाण, गोविंद चव्हाण, बाबाराव राठोड, सचिन राठोड, नितीन चव्हाण, राम राठोड तसेच इतर ग्रामस्थ व मान्यवरांनी सहभाग घेतला.

यावेळी उपस्थितांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याचा आदर्श घेऊन शेती, ग्रामीण विकास आणि समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.

## सहकार सप्ताहाचे औचित्य साधून जनता नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०१, महाबळेश्वर :** सहकार सप्ताहाचे औचित्य साधून जनता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, महाबळेश्वर यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रम, गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने अंजुमन हायस्कूलमधील अनाथ विद्यार्थ्यांना ब्लँकेटचे वाटप तसेच संस्थेचे सभासद डॉ. आफान मानकर यांनी वैद्यकीय क्षेत्रातील एम.बी.बी.एस. पदवी यशस्वीरित्या संपादन केल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या उपक्रमांमध्ये संस्थेचे चेअरमन असिफ मानकर, व्हा. चेअरमन रियाज डांगे, माजी नगरसेवक फकीरभाई वलगे, संचालक नसीम पन्हाळकर, डॉ. सलीम मानकर, अकबर शारवान, संजय साळुंखे, राजमोहम्मद पन्हाळकर, अंजुमन हायस्कूलच्या मुख्याध्यापिका शबाना शेख, यासीन पटेल, पतसंस्थेचे व्यवस्थापक आरिफ शारवान, कर्मचारी वर्ग तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी सहकार चळवळीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धन, शिक्षण आणि गुणवंतांचा गौरव अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमास उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## शाळा प्रवेशोत्सव उत्साहात; नवागत विद्यार्थिनींचे जल्लोषात स्वागत



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०१, चिमूर (चंद्रपूर) :** पी.एम.श्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, चिमूर, ता. चिमूर, जि. चंद्रपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त शाळा प्रवेशोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी व मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या परिसरात आकर्षक सजावट, स्वागत कमान, रांगोळी आणि फुग्यांच्या सजावटीमुळे उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा. सुनिता खोब्रागडे (मुख्याध्यापिका) यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थिनींना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, शिक्षण हीच खरी शक्ती असून प्रत्येक मुलीने आत्मविश्वासाने शिक्षण घेऊन स्वतःचे व समाजाचे भविष्य उज्ज्वल करावे, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

प्रमुख अतिथी मा. निशा राठोड (वनपाल, वनविभाग, चंद्रपूर) यांनी विद्यार्थिनींना पर्यावरण संरक्षण, शिस्त, स्वावलंबन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगत नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पूजा दामोधरे (गृहपाल, मुलींचे वसतिगृह, चिमूर), श्रीमती सावसाकडे (अध्यक्षा, शाळा व्यवस्थापन समिती), श्रीरामे (उपाध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती), मीरा काळे व श्रीमती वनकर यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थिनींचे गुलाबपुष्प, चॉकलेट व टाळ्यांच्या गजरात मनापासून स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील प्रिया बोरकर, विनय खापर्डे व दत्तात्रय पुलेनवार यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक व बाह्यस्रोत कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे संपूर्ण कार्यक्रम उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय पुलेनवार यांनी तर आभार प्रदर्शन प्रिया बोरकर यांनी केले. 'प्रत्येक मुलगी शिकली तर कुटुंब, समाज आणि राष्ट्र घडते' हा संदेश देत नव्या शैक्षणिक वर्षाची प्रेरणादायी सुरुवात करण्यात आली. प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थिनींमध्ये शिक्षणाविषयी आत्मीयता, आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण झाले असून हा सोहळा सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला.

# शिळफाटा परिसरात महापुरासारखी स्थिती; कोट्यवधींच्या नालेसफाईची पोलखोल





## दोन दिवसाच्या मुसळधार पावसात शिळफाटा जलमय

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०१, शिळफाटा (ठाणे) :** ३० जून आणि ०१ जुलै रोजी झालेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे शिळ फाटा-मुंब्रा, शिळ फाटा-पनवेल आणि शिळफाटा-महापे मार्गावर महापुरासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. संपूर्ण शिळफाटा परिसरात पूरस्थिती असून जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

### नैसर्गिक नाले बंद, अनधिकृत बांधकामे कारणीभूत

नैसर्गिक नाल्यांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाल्याने आणि हे नाले पूर्णपणे बंद झाल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. त्यामुळे रस्त्यांवर गुडघाभर ते कंबरेभर पाणी तुंबले. अनेक ठिकाणी वाहने पुराखाली गेली असून प्रचंड वाहतूक कोंडी झाली.

### 'नदी' बनलेली ठिकाणे

शिळगावातील महाकालेश्वर मंदिर परिसर, हनुमान मंदिर परिसर, हाशा रामा पाटील महाविद्यालय, तुळजाभवानी मंदिर परिसर, उमेश वास्कर यांच्या घरासमोरील परिसर, शिळफाटा सर्कल रिगल हॉटेल समोरचा परिसर आणि सुबेदार इंग्लिश हायस्कूल समोरील भाग या सर्व ठिकाणी पावसाचे पाणी तुंबून नदीचे स्वरूप आले आहे.

### नागरिकांचे प्रचंड नुकसान

अनेक वाहनचालकांच्या गाड्या पाण्यात बुडून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे घरातील सामान, इलेक्ट्रॉनिक वस्तू, धान्याचे नुकसान झाले आहे. शाळा-महाविद्यालये, दुकाने बंद ठेवावी लागली. ऑफिसला जाणारे नोकरदार तासन् तास अडकून पडले.

### हीच का नालेसफाई? कोट्यवधींचा हिशोब द्या

ठाणे महानगरपालिकेने यावर्षी नालेसफाईसाठी कोट्यवधी रुपये खर्च केल्याचा दावा केला होता. मात्र पहिल्याच मोठ्या पावसात शिळफाटा परिसर बुडाल्याने 'नालेसफाई झाली होती का?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. ड्रेनेज लाईन साफ न करणे, नाल्यांवरील अतिक्रमण न काढणे हेच या परिस्थितीला जबाबदार आहे.

### लोकप्रतिनिधी रस्त्यावर उतरणार का?

**या गंभीर परिस्थितीनंतर नागरिकांचा जाब आहे :-**

◆ खासदार, आमदार, नगरसेवक पाणी तुंबलेले असतानाच रस्त्यावर उतरून पाहणी करणार का?

◆ पाऊस कमी झाल्यावर 'पाहणी दौरा' काढून उपयोग नाही. प्रत्यक्षात नागरिकांचे हाल स्वतःच्या डोळ्यांनी बघणार का?

◆ जुने नैसर्गिक नाले आणि आराखडा काढून ते पुन्हा खुले करणार का?

◆ नाल्यांवरील अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवणार का?

◆ दोषी ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून कारवाई करणार का?

### TMC ने तातडीने दखल घ्यावी

ठाणे महानगरपालिकेने तात्काळ आपत्कालीन पथके पाठवून पाण्याचा उपसा करावा.

नागरिकांच्या मालमत्तेच्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्यावी. तसेच कायमस्वरूपी उपाय म्हणून नैसर्गिक नाले मोकळे करून, अतिक्रमण हटवून ड्रेनेज व्यवस्था सक्षम करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

खरंच जनतेची काळजी असेल तर लोकप्रतिनिधींनी एसी केबिन सोडून पाण्यात उतरून दाखवावे. नागरिक वाट पाहत आहेत.

## बालगुन्हेगारी कायदे अधिक कडक करण्याची गरज; आ.मुनगंटीवार यांची विधानसभेत ठाम मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** राज्यात वाढत्या बालगुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान कायद्यांचा फेरविचार करून गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांबाबत अधिक कडक कायदेशीर तरतुदी करण्याची आवश्यकता असल्याची ठाम भूमिका राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात मांडली. अल्पवयीनांकडून घडणारे बलात्कार, खून, अमली पदार्थांशी संबंधित गुन्हे यांसारख्या गंभीर घटनांमध्ये होत असलेली वाढ चिंताजनक असल्याचे सांगत, अशा गुन्ह्यांचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नियुक्त करून पुढील अधिवेशनापर्यंत तिचा अहवाल सभागृहासमोर सादर करावा, अशी मागणी आ.मुनगंटीवार यांनी केली.यावेळी बोलताना आ. मुनगंटीवार यांनी आपल्या जिल्ह्यात घडलेल्या गंभीर घटनेचा उल्लेख करत, केवळ अल्पवयीन असल्याच्या आधारावर अशा गंभीर गुन्ह्यांकडे पाहता येणार नाही, असे स्पष्ट केले. गेल्या वीस वर्षांतील आणि सध्याच्या बालगुन्ह्यांची तुलना, गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, त्यामागील सामाजिक व मानसिक कारणे, तसेच अल्पवयीनांचा अमली पदार्थांच्या व्यवहारात होत असलेला वापर याचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता आ. मुनगंटीवार यांनी अधोरेखित केली. या अभ्यासाच्या आधारे कायद्यात आवश्यक बदल सुचविण्यात यावेत, अशीही त्यांनी मागणी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाचे गांभीर्य मान्य करत बालगुन्हेगारीचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येईल, असे आश्वासन दिले. समितीच्या शिफारशींचा अभ्यास करून राज्य सरकारच्या अधिकारक्षेत्रातील उपाययोजना करण्यात येतील, तसेच आवश्यक बाबी केंद्र सरकारकडे पाठवून त्यांचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## जिंतूर काँग्रेसला नवे नेतृत्व; केशवराव बुधवंत ग्रामीण तर सय्यद फिरोजभाई शहराध्यक्ष





**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०१, जिंतूर (परभणी) :** काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आदेशाने आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर राबविण्यात आलेल्या 'सुजाण अभियान' अंतर्गत संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने परभणी जिल्ह्यात नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परभणी जिल्ह्यात या अभियानाची जबाबदारी काँग्रेसचे सचिव तथा वक्फ बोर्डाचे चेअरमन अजमतुल्ला हुसेनी, जितेंद्र दहाडे, मुंडे आणि नागसेन भेरजे यांनी यशस्वीपणे पार पाडली. त्यांच्या अहवालानंतर माजी आमदार बाबाजानी दुर्रानी यांची परभणी ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर बाबाजानी दुर्रानी यांच्या नेतृत्वाखाली जिंतूर तालुका काँग्रेसची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये केशवराव बुधवंत यांची जिंतूर तालुका ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष म्हणून, तर सय्यद फिरोजभाई यांची जिंतूर शहर काँग्रेस अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीसाठी अमोल जाधव, नगरसेवक इस्माईलभाई पैलवान, माजी तालुकाध्यक्ष माधव दाभाडे तसेच अनिलभाऊ गाडेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे सांगण्यात आले.

या नियुक्त्यांमुळे जिंतूर तालुक्यात काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. नवनियुक्त केशवराव बुधवंत आणि सय्यद फिरोजभाई यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांवर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील राजकीय व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# कर्जमाफीसाठी ४३,८१६ शेतकरी ठरले पात्र

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** आजही शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा मानला जातो. मात्र, निसर्गाच्या लहरीपणाचा व अनियमित पावसामुळे याचा मोठा फटका या क्षेत्राला बसत आहे. अनियमित पाऊस, पूर, अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ हे निसर्गाचे चक्र सुरुच असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व पीक कर्जाची थकीत रक्कम माफ करुन खरीप हंगामात पुन्हा पीक कर्ज मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने ' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना- २०२६' जाहीर केली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (सीडीसीसी) ४३ हजार ८१६ पात्र शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आल्याचे जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) जयसिंग ठाकूर यांनी सांगितले.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत धेतलेले एक किंवा अनेक बॅकांचे अल्पमुदत पीक कर्ज, ३० सप्टेबर २०२५ अखेर थकीत असलेले कर्ज आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या कर्जाच्या रकमेसाठी शासनाच्या वतीने २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती जाहीर करण्यात आली आहे. तसेच २ लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्यास वरील रक्कम संबंधित शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२७ पर्यंत बँकेत जमा केल्यास उर्वरित २ लाख रुपये कर्जमाफीची रक्कम राज्य सरकार बँकेत जमा करणार आहे. तर नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. कर्जमुक्ती योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारीत आहे. सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात आहे. या अंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण ४३८६२ खातेदारांपैकी ४३८१६ पात्र खातेदारांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरीत ४६ जणांमध्ये १० खातेदारांचे आधार प्रमाणीकरण नसून ३६ जणांच्या माहितीमध्ये तांत्रिक अडचण आहे.

अशी आहे अपलोड झालेल्या तालुकानिहाय पात्र खातेदारांची संख्या : चंद्रपूर तालुका ११२२(पोर्टलवर अपलोड ११२२), सिंदेवाही २४१०( अपलोड २४०५), राजुरा ३०१४( अपलोड ३०१४), नागभीड ३८५९( अपलोड ३८५१), भद्रावती २०९३ (अपलोड २०९२), ब्रम्हपुरी ४६७२ (अपलोड ४६७०), चिमूर ५४५२ ( अपलोड ५४५१), पोंभूर्णा २१८९ (अपलोड २१८७), मूल २०३३ (अपलोड २०३३), वरोरा ४०८४ (अपलोड ४०७६), कोरपना ५६७१ (अपलोड ५६६३), सावली २८०२ (अपलोड २७९४), गोंडपिपरी ३८९४ (अपलोड ३८९१), आणि बल्लारपूर तालुका ५६७ (अपलोड ५६७).

**शेतकऱ्यांसाठी आवाहन :-**

योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपला आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह ' आपले सरकार सेवा केंद्रात ' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.

# अलंकापुरीत आषाढ वारी पालखी सोहळा हरिनाम सप्ताह

## धार्मिक ज्ञानयज्ञ पर्वणीस उत्साहात प्रारंभ

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०१, आळंदी (पुणे) : आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात आषाढी वारी पालखी सोहळा सन २०२६ अंतर्गत सप्ताह हरिनाम गजरात प्रारंभ झाल्याची माहिती व्यवस्थापक माऊली वीर यांनी दिली. श्रींचे संजीवन समाधी मंदिरात १ ते ८ जुलै या दरम्यान सप्ताह मंदिरात साजरा होत आहे. या निमित्त मंदिरात सायंकाळी चार ते पाच या वेळात प्रवचन आणि सायंकाळी साडेसहा ते साडेआठ या वेळात कीर्तन सेवा होणार आहे.

यामध्ये राज्यातील नामवंत प्रवचनकार अशोक महाराज इदगे, दत्तात्रेय माशेरे महाराज, कृष्णा पडवळ महाराज, ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त योगी निरंजननाथ, भागवत महाराज साळुंखे, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांची प्रवचन सेवा माऊली मंदिरात होणार आहे. तसेच सायंकाळी साडेसहा वाजता राज्यातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे. यात देहूकर महाराज फड, हराळे वैष्णव संस्था, साधकाश्रम संस्था, सिद्धबेट वारकरी शिक्षण संस्था, भाईजी महाराज मोगलगावकर, श्री वालुरकर यांच्या वतीने कीर्तन सेवा रुजू होणार असल्याची माहिती व्यवस्थापक माऊली वीर यांनी दिली.

या सप्ताहाचा प्रारंभ पालखी सोहळा



प्रमुख ॲड राजेंद्र उमाप यांच्या हस्ते पूजा करून झाली. या वेळी विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, व्यवस्थापक माऊली वीर, पुजारी अमोल गांधी, मानकरी बाळासाहेब कुऱ्हाडे, मंगेश आरु, राजाभाऊ चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. वेद मंत्र जयघोषासह हरिनाम गजरात आषाढी वारी २०२६ अंतर्गत सप्ताह आळंदी मंदिरात सुरू झाला.

**आमदार रोहित पवार यांची बैलजोड मानकरी यांचे समवेत चर्चा**

ज्ञानेश्वर महाराज पालखी रथ ओढण्याचा मान रानवडे कुटुंबाच्या तीन ग्रामस्थांच्या बैलजोडींना देण्यात आला आहे. मानाच्या बैलजोडींची पूजा आणि पाहणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी केली. यावेळी त्यांचे बाबा राजेंद्र पवार हि त्यांचे सोबत होते. ते म्हणाले, आळंदी श्रींचे रथाचे बैलजोडीची पूजा करण्याचे भाग्य बाबां समवेत लाभले. आनंदाची, अध्यात्मिक दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.

या सदिच्छा भेटीत त्यांनी तिन्ही बैलजोडी सेवा देणाऱ्या मानकरी यांचे बैलजोडीची माहिती जाणून घेत पाहणी करीत पूजा केली. या मध्ये उमेश रानवडे यांच्या हिरा - लाडक्या, तुळशीराम रानवडे यांच्या सुर्या - रामा आणि हर्षवर्धन रानवडे यांच्या भिम - अर्जुन या बैलजोडींची पाहणी हि केली. या वेळी माजी नगराध्यक्ष देवकाते, आळंदीचे माजी नगराध्यक्ष विद्यमान नगरसेवक राहुल चिताळकर पाटील, नितीन साळुंखे, अनिकेत कुऱ्हाडे, शितल रानवडे, पै.शिवाजीराव रानवडे, साहेबराव कुऱ्हाडे, सौरभ रानवडे, सचिन रानवडे, सौरभ गव्हाणे, प्रियेश रानवडे आदी उपस्थित होते.

आळंदी येथील पीएमपीएमएल बस स्थानकात पावसाने प्रचंड चिखल झाला असून राज्यातून आलेल्या भाविकांची रहदारीत गैरसोय झाली. येथील बस स्थानक भाविक, नागरिकांना विविध नागरी सेवा सुविधा देण्याची मागणी आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर यांनी भाविकांचे वतीने पीएमपीएमएल आणि आळंदी नगरपरिषद प्रशासनास केली आहे. यात पिण्याचे पाणी, स्वच्छता, निवारा शेड व्यवस्था, बस स्थानक परिसरात पथ दिवे आदींचा समावेश आहे.

**या वर्षी पालखी सोहळ्यात नवा ओढण्यास हलका रथ**

या वर्षी श्रींचे पालखी सोहळ्यात सुमारे ३० लाख रुपये खर्च करून आळंदी देवस्थान नवीन लक्षवेधी पालखी रथ आणत आहे. रथ बांधणीचे सुशोभीकरणाच्या काम अंतिम टप्प्यात आले असून सहज भाविकांना दर्शन घेण्यास सुखकर राहणार आहे. या रथाचे वजन पूर्वीचे रथाचे वजनापेक्षा सुमारे १ टणने कमी रहाणार असल्याने बैलजोडीस रथ ओढणे सुखकर आणि सहज होणार आहे. रथ नक्षीकामासह लक्षवेधी होत आहे. यावर पारंपरिक देवदेवतांचे काम लक्षवेधी झाले आहे. यात मारुती, जय विजय आदींचा समावेश आहे. आळंदी देवस्थानसह आळंदी नगरपरिषद, आळंदी पोलीस स्टेशन, आळंदी वीज वितरण कंपनी आणि आळंदी ग्रामीण रुग्णालय पालखी सोहळ्याचे तयारीत व्यस्त आहे. सर्वत्र तयारीची लगबग सुरु झाली असून ठिकठिकाणी तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. अंकापुरी भाविकांचे स्वागतास सज्ज होताना दिसत आहे.

# थोडक्यात

## पालम तालुका काँग्रेस अध्यक्षपदी माधवराव फाजगे, शहराध्यक्षपदी साबेर कुरेशी यांची निवड

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.०१, पालम (परभणी) : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'सृजन संघटन' अभियानाअंतर्गत पक्ष संघटना अधिक सक्षम व मजबूत करण्यासाठी विविध स्तरांवर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पालम तालुका काँग्रेसच्या नव्या पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्षांच्या आदेशानुसार तसेच प्रदेश काँग्रेस कमिटीच्या मान्यतेने, परभणी जिल्हाध्यक्ष बाबाजाणी दुरानी, माजी खासदार तुकाराम रेंगे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, प्रदेश सदस्य नागसेन बेरजे आणि परभणी जिल्हा निरीक्षक जितेंद्र तिहाडी यांच्या शिफारशीनुसार माधवराव फाजगे यांची पालम तालुका काँग्रेस अध्यक्ष म्हणून, तर साबेर कुरेशी यांची पालम शहर काँग्रेस अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



माधवराव फाजगे
ता.अध्यक्ष काँग्रेस



साबेर खुरेशी
शहरअध्यक्ष काँग्रेस

या निवडीमुळे पालम तालुक्यात काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक कामाला अधिक गती मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. नव्याने नियुक्त झालेल्या दोन्ही पदाधिकाऱ्यांचे काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## सोयगाव परिसरात जिओ नेटवर्कचा खेळखंडोबा ग्राहकांमध्ये तीव्र संताप...

अक्षराज : पूनम परदेशी

दि.०१, सोयगाव (छ.संभाजीनगर) : सोयगाव शहरासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये जिओ मोबाईल नेटवर्कचा वारंवार खंडित होणारा व धरसोड करणारा कारभार नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. नेटवर्क सतत ये-जा करत असल्याने जिओ सिमधारक ग्राहक अक्षरशः वैतागले असून, दैनंदिन कामकाजावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.




नेटवर्कच्या समस्येमुळे विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण, नागरिकांची विविध ऑनलाइन कामे तसेच शासकीय कार्यालयांतील इंटरनेटवर आधारित सेवा वारंवार ठप्प होत आहेत. अनेक ठिकाणी नेटवर्क उपलब्ध नसल्याने ऑनलाइन अर्ज, बँकिंग व्यवहार, शासकीय पोर्टलवरील कामे आणि इतर डिजिटल सेवा रखडत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

या समस्येबाबत जिओ कंपनीकडे तक्रार करण्यासाठी स्थानिक स्तरावर कोणतेही कार्यालय उपलब्ध नसल्याने ग्राहकांची गैरसोय होत आहे. तसेच १९८ आणि १९९ या ग्राहक सेवा क्रमांकांवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास केवळ स्वयंचलित संदेश (अनाउन्समेंट) ऐकू येत असून, प्रत्यक्ष समस्येचे निराकरण होत नसल्याची ग्राहकांची भावना आहे.

सततच्या नेटवर्क समस्येमुळे अनेक ग्राहकांनी जिओ ची सेवा बंद करून इतर दूरसंचार कंपन्यांच्या सेवेकडे वळण्यास सुरुवात केली आहे. नियमितपणे रिचार्ज करूनही नेटवर्क उपलब्ध नसल्याने दैनंदिन डेटा वापरता येत नाही. त्यामुळे वाया जाणाऱ्या डेटा आणि सेवेची भरपाई कोण देणार, असा प्रश्न ग्राहक उपस्थित करत आहेत.

सोयगाव तालुक्यातील ग्राहकांमध्ये जिओ कंपनीविरोधात तीव्र नाराजीचे वातावरण असून, कंपनीने तातडीने तांत्रिक अडचणी दूर करून नेटवर्क सेवा सुरळीत करावी, तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण करण्यासाठी स्थानिक पातळीवर यंत्रणा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

# घरकुलाच्या अनुदानासाठी २० हजारांची लाच

## सात्रळ ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी, कंत्राटी लिपिक व अभियंता एसीबीच्या जाळ्यात

अक्षराज : प्रमोद डफळ

दि.०१, राहुरी (अहिल्यानगर) : ०१ जुलै, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलाच्या पुढील अनुदानाचा हप्ता मंजूर करून देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारल्याप्रकरणी राहुरी तालुक्यातील सात्रळ ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी, कंत्राटी लिपिक आणि कंत्राटी अभियंता यांच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) कारवाई केली आहे.

याप्रकरणी कंत्राटी लिपिकाला रंगेहाथ पकडण्यात आले असून तिघांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, सात्रळ ग्रामपंचायतीचे ग्राम विकास अधिकारी हैदर याकूब पटेल (वय ५६), कंत्राटी लिपिक ज्ञानदेव मोहन डुकरे (वय ४३) आणि कंत्राटी अभियंता सचिन हौशीराम ब्राह्मणे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ मधील कलम ७ व १२




अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तक्रारदारास सन २०२३ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले होते.

पहिला १५ हजार रुपयांचा आणि दुसरा ७० हजार रुपयांचा हप्ता प्राप्त झाल्यानंतर उर्वरित अनुदान मंजूर करून देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच मागण्यात आल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर ग्रामविकास अधिकारी हैदर पटेल आणि कंत्राटी लिपिक ज्ञानदेव डुकरे यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मंगळवारी एसीबीने सापळा रचला. यावेळी कंत्राटी लिपिक ज्ञानदेव डुकरे याने तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ ताब्यात घेतले.

या लाच व्यवहारासाठी कंत्राटी अभियंता सचिन ब्राह्मणे यांनी डुकरे यास प्रोत्साहन दिल्याचा आरोपही एसीबीने केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पोलीस निरीक्षक सविता तांबे, पोलीस निरीक्षक राजू आल्हाट व त्यांच्या पथकाने सापळा यशस्वी केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक छाया देवरे करीत आहेत. दरम्यान, शासकीय कामासाठी कोणत्याही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी निर्भयपणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन एसीबीने केले आहे.

# पंढरपुरात प्रशासनाकडून अतिक्रमण हटाव मोहीम सुरू

## आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर कारवाईला वेग



अक्षराज : विकास सरवळे

दि.०१, पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असून, यात्राकाळात श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपुरात दाखल होतात. येणाऱ्या वारकरी भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांना शहरात रहदारीचा कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पंढरपूर नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम मंगळवार, दि.३० जूनपासून सुरू केली आहे, अशी माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

यंदा आषाढी यात्राकाळात सुमारे १८ ते २० लाख भाविक दर्शनाला येतील, असा प्रशासनाचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी व मंदिर परिसरातील अतिक्रमणे काढण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. या मोहिमेत मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह २५ पोलीस व नगरपालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांचे पथक सहभागी झाले आहे. जेसीबी, ट्रॅक्टर आणि टेम्पोसह हे पथक रस्त्यावर उतरून अतिक्रमणावर थेट कारवाई करत आहे. दि.३० जूनपासून छत्रपती शिवाजी चौक ते अर्बन बँक, अर्बन बँक ते इंदिरा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक ते सावरकर चौक तसेच भाई राऊळ पुतळा चौक ते छत्रपती शिवाजी चौक (स्टेशन रोड) येथील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. शहरातील अतिक्रमण केलेल्या व्यापारी व विक्रेत्यांना अतिक्रमण काढण्याबाबत नगरपालिका प्रशासनाने पूर्वसूचना दिल्या होत्या. मात्र संबंधितांनी अतिक्रमणे न काढल्याने अखेर कारवाई करावी लागत आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले. शहरातील सर्वच भागात पोलीस प्रशासन व नगरपालिका प्रशासनाच्या वतीने टप्प्याटप्प्याने अतिक्रमणाची कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रांताधिकारी सचिन इतापे व सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी सांगितले.

## शिवाजीनगर ग्रामपंचायतीच्या संकल्पनेतून साकारले पेरूचे गाव



अक्षराज : प्रतिनिधी

दि.०१, उंब्रज (सातारा) : शिवाजीनगर,ता कराड येथील ग्रामपंचायत, रोटरी क्लब ऑफ उंब्रज आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, उंब्रज यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' या उपक्रमांतर्गत शिवाजीनगर येथे 'पेरूचे गाव' ही अभिनव संकल्पना साकारण्यात आली. पर्यावरण संवर्धनासह ग्रामस्थांच्या आरोग्याचा विचार करून गावातील प्रत्येक कुटुंबाला तैवान पिंक जातीच्या पेरूच्या रोपांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात पेरूच्या रोपांचे वृक्षारोपण करून करण्यात आला. भविष्यात शिवाजीनगरची ओळख 'पेरूचे गाव' म्हणून निर्माण व्हावी, तसेच वाढते प्रदूषण रोखून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धनाची चळवळ गावपातळीवर रुजावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

रोपांचे वाटप करताना प्रत्येक कुटुंबाने रोपांची योग्य पद्धतीने लागवड करून त्यांचे जतन व संगोपन करावे, असे आवाहन करण्यात आले. उत्कृष्ट संगोपन करणाऱ्या कुटुंबांचा पुढील वर्षी शिवाजीनगर ग्रामपंचायत आणि रोटरी क्लब ऑफ उंब्रज यांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात येणार असल्याची घोषणाही यावेळी करण्यात आली.या कार्यक्रमास सरपंच सुरेखा पवार, ग्रामपंचायत अधिकारी गौरी कांबळे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, रोटरी क्लब ऑफ उंब्रजचे अध्यक्ष विश्वनाथ केंजळे, रोटरीचे आजी-माजी अध्यक्ष व सदस्य, प्राथमिक आरोग्य केंद्र उंब्रजचे आरोग्य निरीक्षक अमित जाधव, विकास गरुड, भोसले सर, गावातील युवा सामाजिक कार्यकर्ते, महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वरसई येथील शासकीय आश्रमशाळेत पोलीस काका-पोलीस दीदींचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

अक्षराज : मितेश जाधव

दि.०१, पेण (रायगड) : पेण पोलीस ठाण्याच्या वतीने वरसई येथील शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी पोलीस काका सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (अडख) घरत व पोलीस दीदी महिला सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (अडख) घरत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत विविध महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शाळेतील २७२ विद्यार्थी व १५



शिक्षक उपस्थित होते. विद्यार्थ्यांना डायल ११२ या पोलीस हेल्पलाईनची माहिती, दामिनी पथकाची भूमिका तसेच पोलीस दीदींचे संपर्क क्रमांक देण्यात आले. तसेच गुड टच-बॅड टच, बालविवाह प्रतिबंध, बालकांचे शोषण रोखण्यासाठीचे कायदे, पोलीस काका-पोलीस दीदी ही संकल्पना, वाहतूक नियमांचे पालन व रस्ते अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी, सायबर फसवणूक व कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा गैरवापर, तसेच मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच सुरक्षित व जबाबदार नागरिक बनण्याचा संदेश या मार्गदर्शन कार्यक्रमातून देण्यात आला.